(३८)

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांत रोहयो खाली सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम........

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय, नियोजन विभाग :रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १५ डिसेंबर, २००६

**प्रस्तावना :**

विदर्भातील बुलढाणा, अकोला वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांमध्ये केंद्र व राज्य शासनाने शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीकरिता अनेक पावले उचलली आहेत. यापैकी एक पाऊल म्हणजे राज्य शासनाने जाहीर केलेले विशेष पॅकेज. जलसंपदा विभागाच्या सिंचन विहिरी दर्शक अहवाल २००५-०६ नुसार जून, २००५ अखेर राज्यात ४० लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून त्यापैकी विदर्भातील ओलिताखालील क्षेत्र मात्र ८.६ लाख हेक्टर आहे. राज्यातील एकूण विहिरींची संख्या पुणे विभाग १,३१,१२९, नाशिक विभाग १,२६,२६५ आणि नागपूर २२,७८४ व अमरावती विभाग २४,४८१ इतकी आहे. थोडक्यात नागपूर व अमरावती विभागात विहिरींची संख्या कमी आहे. ही कमतरता लक्षात घेता या दोनही पॅकेज अंतर्गत सिंचनासाठी रु. २२५५ कोटी व पाणलोट विकासासाठी रु. २४० कोटी उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे. या योजनेची अंमलबजावणी झाल्यावर सिंचनामध्ये निश्चितच वाढ होईल. जवाहर विहिर योजने अंतर्गत ६ जिल्हयांमध्ये एकूण ३५४७५ विहिरी हाती घेण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारच्या सिंचन विहिरी मोठया प्रमाणावर घेऊन वाढलेल्या भूगर्भातील उपलब्ध पाण्याचा वापर करुन सिंचनाखालील क्षेत्र वाढविणे अल्प कालावधीमध्ये शक्य आहे. असे केल्यास शेतक-यांना मोठया प्रमाणावर दिलासा मिळू शकेल. ही बाब लक्षात घेता या ६ जिल्हयांमध्ये सिंचन विहिरींचा मोठा कार्यक्रम हाती घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या सर्व बाबी विचारात घेऊन आता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१) विदर्भातील ६ जिल्हयांतील (बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा) प्रत्येक तालुक्यात (१०००) याप्रमाणे एकूण ६४,००० सिंचन विहिरींचा एक मोठा धडक कार्यक्रम राबविण्यात यावा.

२) या सिंचन विहिरींचे तांत्रिक व आर्थिक मापदंड जवाहर विहिर योजनेप्रमाणेच राहतील.

३) या कार्यक्रमाचा उद्देश ज्या शेतक-यांना सिंचनाची सोय उपलब्ध होत नाही व नजिकच्या काळात होणार नाही. तसेच ते अल्प, अत्यल्प, मागासवर्गीय, कमकुवत गटातील तसेच ज्यांची आर्थिक क्षमता देखील अपुरी आहे. मात्र, त्या भागातील भूगर्भात पुरेसे पाणी उपलब्ध आहे. अशा क्षेत्राचा विचार करावयाचा आहे. शासनामार्फत फक्त तालुका स्तरचा लक्षांक दिलेला आहे. त्याचे गाववार वाटप करतांना हे देखील पाहणे आवश्यक आहे की भूगर्भातील पाण्याच्या पातळीवर अशा सिंचन विहिरीमुळे विपरित परिणाम होणार नाही. त्याकरिता समतोल पध्दतीने विहिरी मंजूर करणे आवश्यक आहे. याकरिता पुढील समितीने महासंचालक वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन, अमरावती यांच्या सहकार्याने गाववार विहिरींचे सुयोग्य लक्षांक ठरवावे.

प्रपत्र (७)

**समितीचे गठन**

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | सदस्य |
| ४) | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५) | जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी | सदस्य |
| ६) | तालुक्याचे संबंधित गटविकास अधिकारी | सदस्य-सचिव |
| ७) | तालुक्याचे संबंधित तहसिलदार | सदस्य |

वरील समितीने गाववार क्षेत्र व लक्षांक निश्चितीची कार्यवाही सुरु करावी व कृती आराखडा तयार करावा. वैयक्तिक लाभार्थी निवडीबद्दल निश्चित पध्दती शासन कळविल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( कांचन विजयन )
अवर सचिव,नियोजन विभाग.

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री
३. मा.उपमुख्यमंत्री
४. सर्व मंत्री
५. सर्व राज्यमंत्री
६. मुख्य सचिव
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
८. सर्व विभागीय आयुक्त
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट राज्य, पुणे
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (संबंधित जिल्हयांचे)
१३. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (संबंधित जिल्हयांचे)
१४. जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी (संबंधित जिल्हयांचे)
१५. उप विभागीय अधिकारी (महसूल) (सर्व संबंधित जिल्हयांचे)
१६. तहसिलदार (सर्व संबंधित जिल्हयांचे)
१७. गट विकास अधिकारी (सर्व संबंधित जिल्हयांचे)
१८. सर्व मंत्रालयीन विभाग
१९. निवड नस्ती.

(७)